Maharashtra Times, Pune 23.09.2014 Pp. 1

# पूर्वपरीक्षेत मंगलयान यशस्वी

## यानाचे मुख्य इंजिन कार्यरत

**मयुरेश प्रभुणे, बेंगळूरू**

मंगलयानाचे मुख्य इंजिन सुरू झाल्याचा संदेश सोमवारी दुपारी दोन वाजून ४२ मिनिटांनी स्क्रीनवर उमटला आणि मंगळ मोहिमेच्या कंट्रोल रूममध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) शास्त्रज्ञांनी एकच जल्लोष केला. तब्बल तीनशे दिवस बंद असणारे ४४० न्यूटन क्षमतेचे द्रवरूप इंजिन चार सेकंदांसाठी प्रज्ज्वलित करून यानाचा मार्ग सुधारण्यात 'इस्रो'ला यश आले. पूर्वपरीक्षा मानला गेलेला आजचा टप्पा यशस्वीपणे पार पडल्यामुळे, बुधवारी (२४ सप्टेंबर) मंगलयान मंगळाच्या कक्षेत प्रस्थापित होणारच, असा विश्वासही इस्रोने व्यक्त केला.

'मंगल'गान

यानाचे मुख्य इंजिन प्रत्यक्षात दुपारी अडीच वाजता सुरू झाले असले, तरी यानाकडून पृथ्वीपर्यंत संदेश येण्यासाठी १२ मिनिटांचा कालावधी लागला. या मोहिमेतील शास्त्रज्ञांसाठी ही १२ मिनिटे अत्यंत दडपणाचे होते. मात्र, सर्व प्रक्रिया अपेक्षेप्रमाणे पार पडल्याचा यानाकडून संदेश येताच अनेक शास्त्रज्ञ आपले आनंदाश्रू रोखू शकले नाहीत.

मंगलयानाच्या आजच्या यशाबाबत 'इस्रो'चे वैज्ञानिक सचिव डॉ. व्ही. कोटेश्वर राव म्हणाले, 'यानाचे मुख्य इंजिन ३.९८६ सेकंदांसाठी प्रज्ज्वलित झाले. यावेळी यानाने ५६४ ग्राम इंधन वापरले. सध्या यान २२ किलोमीटर प्रतिसेकंद वेगाने मंगळाच्या जवळ जात असून, २४ तारखेला हा वेग १.६ किलोमीटर प्रतिसेकंद इतका कमी करावा लागणार आहे.'

**आता आम्ही निश्चिंत झालो असून, सर्वांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. आजच्या टप्प्याप्रमाणेच अचूकता सांभाळून २४ तारखेला यान मंगळाच्या कक्षेत फिरू लागेल.**

**- डॉ. के. राधाकृष्णन, अध्यक्ष, इस्रो**

### पंतप्रधानांची उद्या उपस्थिती

बेंगळुरू : भारताचे 'मंगलयान' मंगळाच्या कक्षेत बुधवारी प्रवेश करणार असून हा ऐतिहासिक सोहळा 'याचि देही याचि डोळा' अनुभवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'इस्रो'मधील मंगळ मोहिमेच्या 'कंट्रोल रुम'मध्ये उपस्थित राहणार आहेत. 'इस्रो'चे वैज्ञानिक सचिव कोटेश्वर राव यांनी यासंदर्भातील वृत्ताला दुजोरा दिला आहे. बुधवार दिनांक २४ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजून १७ मिनिटांनी मंगलयान मंगळाच्या कक्षेत प्रवेश करणार आहे.